INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 7 | AUGUST– 2020

# पेशवेकालीन शुद्र जाती

वामन रामराव वैद्य
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.

## प्रस्तावना:-



मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात जातिसंस्था प्रबळ असून आपले व्यवहार स्वतंत्रपणे करीत असत. राजा किंवा राज्यव्यवस्था जाती संस्थेच्या व्यवहारात हस्तक्षेप करीत नसत. पेशवे काळात महाराष्ट्रातील जातिसंस्था आणि त्यांचे जीवन असेच स्वतंत्र होते. पण जाती जीवन नेहमीच राज्यकर्त्यांच्या हस्तक्षेपापासून दूर राहील याची शाश्वती नव्हती. जेंव्हा छत्रपतीकडन राज्यकारभार पेशव्यांच्या हातात केंद्रित झाला .तेंव्हापासून पेशवे राज्याचे सर्वे सर्वा झाले. त्यावेळी राज्याची राजकीय सामाजिक आर्थिक धार्मिक न्यायविषयक सत्ता त्यांच्या हाती केंद्रित झाली .तेंव्हा मात्र त्यांचा जातीच्या जीवनात प्रत्यक्ष हस्तक्षेप सुरू झाला. तत्कालीन पेशवे रोजनिशी, उपलब्ध संदर्भ साधनांचा अभ्यास केल्यास आपणास या गोष्टीची कल्पना येते. पेशवे काळ म्हटले की अस्पृश्यता अस्पृशावरील कठोर अशी सामाजिक, धार्मिक बंधने याच गोष्टी समोर येतात. अस्पृश्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी छोटे मडके आणि पाठीशी पावलांच्या खुणा पुसण्यासाठी झाडू. त्याचबरोबर मराठा जातींनी तलवार गाजविली. ब्राहमणांनी पुण्यात बसून राज्य केले. दक्षिणा वाटल्या हातात तलवार धरून पराक्रम गाजवले याचबरोबर त्यांनी अटकेपार झेंडे लावले. मराठी राज्याचा विस्तार सर्व हिंदुस्तानात केला या सर्व गोष्टी चटकन लक्षात येतात. पेशवेकाळात अस्पृश्यांवर ज्या प्रकारची कठोर बंधने होती त्याच प्रकारची बंधने शूद्र जातीवर सुद्धा लादली गेली होती. शूद्र जातीची स्थिती सुद्धा अस्पृश्या सारखीच होती. हे मात्र आपण अनवधानाने विसरून जातो. म्हणूनच या लेखामध्ये पेशवे काळातील महाराष्ट्रातील शुद्र जाती आणि त्यांच्या सामाजिक , आर्थिक, धार्मिक न्याय विषयक, बंधनांचा या लेखामध्ये उहापोह केलेला आहे.

## शूद्र कोण?

पेशवेकालीन महाराष्ट्रात शूद्र कोणास म्हणावे, या प्रश्नाच्या उत्तरासाठी काही संस्कृत वांग्मययाची किंवा प्राचीन दाखले देण्याची गरज नाही. कारण पेशवेकालीन महाराष्ट्रामध्ये ब्राम्हण आणि अस्पृश्य, अतिशूद्र या दोन जाती व्यतिरिक्त हिंदूधर्मातील उरलेला सर्व समाज शूद्रा मध्ये गणला जात होता.

१) बलुतेदार शूद्र जाती:-

१) सुतार:-बलुतेदारात सुताराचा वरचा दर्जा होता सुतार या जातीस गाव कामगारत महत्त्वाचे स्थान होते. शेतीविषयक निरनिराळी अवजारे तो बनवीत असे .सुतारात पुढील पोट जाती दिसून येतात. मराठी सुतार, देशी सुतार, कोकणी सुतार, गुजराती सुतार इत्यादी.

२) कुंभार:-कुंभार हा मातीपासून रांजणकुंभार जातीत पुढील पोट .मडकी मातीची भांडी तयार करीत असत , भांडू .बडदे .अहिर किंवा लहान चाकी .जाती होत्या,गुजर ,गोरे मराठे ,हातगडे, किंवा भेंडी किंवा भेंडेकर हातोडे, कन्नड अथवा किंवा लिंगायते ,खंभारी, कोकणी किंवा थोर चाके मराठा किंवा घाटी परदेशी राजपूत , सुरतिया ,वाऱीआ आणि बाटलीआ हे मराठा कोकणी व गुजराती परदेशी कुंभार इमारतीचे काम विटा आणि कवले करीत असत. तसेच मराठे कुंभार मडकी करीत असत.

३) परीट:-परीट हे कपडे धुण्याचे काम करीत असत गावकऱ्यांचे धुणे धुऊन देत ,नवरा नवरी वर चांदवा धरणे , पायघड्या घालणेहेही काम परीटच करीत असत.

४) न्हावी:-नाही हे केस कापण्याचे काम करीत असे समारंभ मिरवणुकीत मशाल धरण्याची काम नाव्ही करत असत न्हाव्यास.त्यांना वाजंत्री असे समजले जात असे .हजाम असेही म्हणत असत .न्हावी जातीत मराठा आणि कोकणी असाही पोटभेद होता.

५) लोहार:- गाव कामगार म्हणून या लोहारास नांगराचा फाळ व वसू, कुळवाची वसू, पायरीचे फारोळे ,विळी , खुरपे ,कुऱ्हाड, इत्यादी सर्व वस्तू त्याला कराव्या लागत असत. लोहारा मध्ये मराठा लोहार ,पांचाळ, कोकणी लोहार, गुजराती लोहार ,कन्नड लोहार इत्यादी पोटभेद किंवा पोट जाती होत्या.

६) सोनार :-सोन्याचे दागिने बनविणारे सोनारसोनारात दोन वर्ग .सोनारकी हा या जातीचा धंदा होता . ,कडू ,देवांग अथवा दैवज्ञ अथवा पांचाळ सोनार देशी अथवा मराठे सोनार ,अहिर किंवा खानदेशी .होते शीलवंत ,लाड ,माळवी परदेशी ,लाड ,कोकणी अथवा दैवज्ञ ,कन्नड ,दासीपुत्र अथवा विदुर, वैश्य अथवा जैन यातच देव सोनार ही पोट जात होती.

७) गुरव:-देवाच्या देवळात पूजाअर्चा करण्याचे काम . गुरुवाचे होते यामध्ये देशकर ., वराडे म्हणजे वऱ्हाडात राहणारेझडे जंगलात राहणारे या दोन पोट जाती होत्या ,.

८) कोळी :- कोळी जातीत दोन पोट भेद दिसून येतात ते साधे कोळी ,डोंगरी कोळी होत ,यातही सोनकोळी . मासे मारणे इत्यादी धंदे करून पोट ,उच्चवर्णीयांच्या घरी पाणी भरणे .महादेव कोळी इत्यादी पोटभेद होते .भरीत असत

२ (अलुतेदार शुद्र जाती :-

१ (तेली :- तेलाचा घाणा चालवून तेल काढणे .तेल विकणे हा त्याचा धंदा होता ,तेल पुरवठा करणे ,यामध्ये दोन जाती होत्या(१. एकबैले तेल गाळण्यासाठी एकाच बैलाचा वापर करीत असत(२ . दोन बैले दोन बैलांचा साहयाने तेल गाळण्यासाठी उपयोग करीत असत या दोन जाती आहेत.

२तांबोळी (:-तांबोळी ही जात पाने विकण्याचा धंदा करीत असेतांबोळी या ,तांबोळी या जातीत तानावली . नावाची एक पोटजात अरक व लोहार यात आढळते. ही जात शेती करणारी असून ते स्वतः मोगलांचे वंशज समजत.

३ (शिंपी :-शिवणकाम करणारी जात म्हणजे शिंपी होय्या जातीत व्यवसाय आणि त्यांच्या प्रकारावरून . शिंपी रंगारी व ,मराठा शिंपी ,शिंपी ,अहिरनीलारीआदि पोट जाती ,नामदेव शिंपी , निर्माण झाल्याचे दिसून येते.

४ (माळी :-माळी म्हणजे माळी काम करणारे तसेच फुलांचा व्यवसाय करणारेभाजीपाला ,मुंडावळी व फुलपत्री , .जिरेमाळी असत ,यांच्यातील उपजाती फुलमाळी .बागायती करीत असत-शेती .पुरविण्याचे काम करीत असत तसेच मराठा माळी, गुजराती माळी, कानडी माळी असे प्रकार दिसून येतात.

५ (भोई:-भोई जात डोली व पालखी वाहण्याचे काम करीत असततसेच मच्छीमारीचा धंदाही हे करीत असत . भोई इत्यादी भेद होते ,वऱ्हाडी भोई ,पुणे प्रांतात यांचे खास भोई .या जातीत पोटभेद असे.

६ (साळी:-साळी ही जात विणकर जात होय सामान्य विणकर जाती या साळी जातीत मोडत असतत्यात . ,स्वकुल साळी ही एक पोटजात होतीया स्वकूल साळ्यात शुद्ध, बांगड अशा प्रकारच्या सहा पोट जाती होत्या.

७ (गोंधळी:-गोंधळी ही देवाच्या नावावर गोंधळ घालणारी जात होयगोंधळी जातीत पुढील पोटजातीचा . क ,त्यात ब्राह्मण गोंधळी .अंतर्भाव होतोुंभार गोंधळी आणि इतर गोंधळी तसेच कडमराय ,रेणुकाराय , अक्करमाशी इत्यादी पोट जाती होत्या.

८(गोसावी:-गोसावी हे भिक्षा मागणारे व पूजा करणारी जात होते या जातीस गोसावी गोस्वामी या नावानेही ओळखले जाते. गोसावी यामध्ये गिरी ,पुरी ,पर्वत ,सागर ,बंनतीर्थ, भारती सरस्वती, अरण्य व आश्रम ही मुख्य आडनावे होती.

९ (धनगर :-शेळ्यामेंढ्या आणि म्हशी इत्यादी जनावरे पाळीत व त्यांचा धंदा करणारी जात म्हणजे धनगर - जात होय.

१० (जिनगर :-बाशिंग तयार करणे नक्षत्रमाला तयार करणे या वस्तू लग्नात पुरविण्याचे काम जीनगराचे होते. जीनगर जातीत चित्रकार, सुतारकासार वगैरे धंदेही चालत असत ,लोहार-.

११(जोगी:-जोगी ही जात मठ करून रीती वरही राहणारी म्हणून जोगवा मागत असावे राहण्याच्या ठिकाणावरून त्यांच्यात गुजराती जोगीमराठी जोगी असे भेद आहेत ,.

१२ (कासार:-कासार जात तोफगोळे वज्ञाची काम करीत असत तसेच ते तांब्याची आणि पितळेची भांडी करून विकत असत बांगड्यांचा धंदाही ते करत असत तो अष्ट कासार बोगार पांचाळ कासार असे वर्ग यांचे पडतात बेगार वर्गातच म्हणून धंदा करणारे लोक होते.

१३ (कोष्टी :-कोष्टी ही कपडा तयार करणारी व त्याची विक्री करणारी जात होययांच्या पोटजा .ती कडू , ,कोष्टी ,लाड ,हळबीगंधेवाल .देशकर ,देवांग, परवी इत्यादी आहेत .ओकळे हे गोलक संतत्तीचे समजत , साकेवरात सुतवाले व पोटसाले असे दोन वर्ग असत .सगुण साले वर्ग हा गोलक समजत असे.

१४ (कुणबी :-कुणब्यांचा शेती करणे हा व्यवसाय होताकुणबी किंवा कुळंबी असे यांना . ओळखले जात असे . आणि दक्षिण व .गुजराती कुणब्यात मूळ गुजर जातीचा भरणा जास्त होता .कुणब्यांच्या कुळ्या अनेक होत्या .लेवा कुणबी यांना पट्टेदार असेही म्हणत असत .कोकणी कुणब्यात मराठा जातीचा भरणा असे मराठी कुणबी, वराडी कुणबी अशी यात विभागणी होती. काही कुणब्यांत रोटी- व्यवहार सोडला तर बेटी व्यवहार होत नसे.

१५ (गवळी :-गवळी ही जात दुधाचा धंदा करणारी होय यावरून्च तिला गवळी असे नाव पडले. धंद्यावरून ही जात निर्माण झालेली आहे .धनगर ,गुरुबा ,मराठा, कुणबी इत्यादी जातीचे लोक यात येतात. यामध्ये आठ पोटभेद आहेत. एकमेकात रोटी बेटी व्यवहार होत-नसे. तसेच कानडी , गोपाळ किंवा गवळी हाही गवळ्याचा पोट भाग समजला जात असे.

१६ (पारधी :- पारधी यांचा धंदा शिकार करणे डुक्कर, तितर, लावा व पोपट वगैरे पक्षी धरून ते बाजारात विकून उदरनिर्वाह करणे. ही जात चोरी वगैरे करण्यात पटाईत होती असेही समजले जाते. या जातीत पाच वर्ग दिसून येतात फासेपारधी, हरण पारधी, मोर पारधी व वाहारी पारधी इत्यादी.

१७ भंडारी (:- भंडारी ही जात ताडा माडाच्या झाडापासून गुळ काढणे आणि त्यापासून दारू बनवून ती विकून आपला उदरनिर्वाह करणे.

१८ (बेलदार :- बेलदार जात ही माती खणणे ,बांधकामासाठी ची कामे करणे ,गवंडी काम करणे ,दगड फोडणे , .मजुरी कामे करणे यांना वडाला प्रमाणे काम करावे लागत असे वडारांनाही बेलदार म्हटले जाई.

१९ (पाथरवट:- पाथरवट ही जात कामानिमित्त या गावावरून दुसऱ्या गावी भटकणारी आहे. दगड काम ही जात करीत असे यांच्या पोट जाती मराठी ,कामाठी, तेलंगी असे तीन वर्ग यांच्यात आहेत.

२०वंजारी (:- वंजारी जात काही कागदपत्रात काही ठिकाणी या वंजारी जातीचा उल्लेख "वणजारे" असा येतो. या वंजारी जातीचा धंदा बैलांचे तांडे बाळगून मालाची ने आण करणे हा-होता. यांच्या पोट जाती चारण ,गवार , भाधूर ,लाड ,खदान ,लमधे ,हरान ,भुसारे ,असरकार ,शविजन इत्यादी होत्या.

२१ (बैरागी:- बैरागी या जातीची पलटणे होती ही जात सावकारी करीत असे बैरागी यांच्या चार संप्रदाय होते . रामानुजी ,निंबाबदी, विष्णूस्वामी महव,इत्यादी.

२२(कोमटी:- कोणतीही व्यापारी जात म्हणून ओळखली जात असे.

२३ (बुरुड :- बुरुड या जातीचा धंदा बुरुड काम करणे होय

२४(घिसाडी :- विषारी या जातीचे लोक गावोगाव फिरतात गावाजवळ बारदान यांच्या पालात उतरतात. सर्व ओझे गाढवावर वाहतात लोखंडाचे काम करणे हा या जातीचा धंदा आहे.

२५ (कैकाडी :- कैकाडी ही जात गावाबाहेर उघड्या पटांगणावर झाडाच्या सावलीत उतरतेआणि त्यांच्यासोबत . ,करंजी वगैरे चे फोटो काढून त्यांच्या पाट्या तयार करणे कणगी ,ते पिरकुल .कोंबडी असतात ,कुत्रे ,गाढव ही जात भीक मागून खातात व चोरीही करीत असतात .कोंबड्याचे डाले करत आणि विकत असे.

वरील शूद्र जाति मध्येच पुढील जातींचा समावेश होतोकनिष्ठ ,तत्सम ,यातील काही जाती आलुतेदार . .या जातीची नामवली पुढील प्रमाणे आहे .फिरत्या कनिष्ठ जाती अंतर्गत येतात ,जातीभाट, वाजंत्री,धडशी , कलावंत, राजपूत, गुजर ,बारगीर ,बंडगर ,गवंडी ,रामोशी ,बेरड ,बडवे ,भिल्ल ,संन्याशी, फकीर, तांबट,ठक्कर , लमान ,गरुड ,कलाल ,बंजारा ,सरगर ,हलार ,ढोल्या ,सराफ ,पंचाक्षरी ,सौदागर ,गारदी ,कामठी ,नीलारी , लोणारी ,माकडवाले ,हरदास, भगत, इत्यादी.

याच शूद्र जातीने ग्रामसंस्था किंवा गावकी बनत असेगावगाड्यात , या शूद्र जाति सामाजिक आणि आर्थिक संस्था म्हणून काम करीत असत. या शूद्र जातीमध्ये एकोपा असावा अशी स्थिती नव्हती. तरीसुद्धा यांची उपस्थिती गावगाड्यातील कामात आवश्यक ठरत असे.

अशाप्रकारे पेशवेकाळात महाराष्ट्रातील शूद्र जातीची वैशिष्ट्य या लेखामध्ये मांडलेली आहेत.

## संदर्भ ग्रंथ.

१) डॉपी..ए.गवळी, पेशवेकालीन महाराष्ट्र

२) ओतुरकर र.वी.( संपा( पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार.

३) सरदेसाई गोस..(संपा( पेशवे दप्तर

४) जोशी शबा.. मराठेकालीन समाज दर्शन

५) भावे,वाकृ.. पेशवेकालीन महाराष्ट्र.